ISSN-0971-2156 IMPACT FACTOR (2020) 5.24

SPECIAL ISSUE ON
INTERNATIONAL E-CONFERENCE
JANUARY-2021

# RESEARCH CARE ASSOCIATION

## *International E-Conference on Social Science, Science & Technology, Management and Humanities (ICSSMH) 2021*

Editors
Dr. A. Nageshwarrao
Mr.Shubham Ambhore

# INDEX


| Sr. No. | Title of the Papers | Name of Authors | Page No. |
|---|---|---|---|
| 01 | Analysis of National Food Security Act | Prof.Arun M.Rakh | 01 |
| 02 | The effect of mobile retailing on consumers' purchasing experiences: A dynamic perspective | Dr.A.M. Chandre<br>Mr. A.N. Dhiver | 04 |
| 03 | Geographical Study of Farmer Suicide in Maharashtra: Special Reference to Marathwada | Dr.A.I.Khan | 09 |
| 04 | Art and Science of Voice Culture | Dr.Surekha Murlidharrao Joshi | 14 |
| 05 | Kitchen gardens:-Their Social, Economic and Environmental Contributions to Community | Dr. Jogdand S. K. | 18 |
| 06 | Causes and Impact of Labour Migration: A Case Study of Marathwada Region | Dr.Sidharth S. Jadhav<br>Mr.Sandeep G. Vale | 20 |
| 07 | Indian Modern Agricultural Systems | Dr.Baban M Mohite<br>Kendre Rameshwar Dhondiba | 24 |
| 08 | A Study of Human Resources Management Practices and its Impact on Employees job Satisfaction in Private Sector Banks: A Case Study of Yes Bank | Muntaser A. Almaamari | 26 |
| 09 | Human Rights and Issue of Global Health | Dr. R. K. Kale | 32 |
| 10 | Mobile Marketing in the Retailing Environment | Dr.A.M. Chandre<br>Mr. A.N. Dhiver | 35 |
| 11 | Emerging Issues in E-Commerce in India | Dr. Anurath M. Chandre | 39 |
| 12 | Cyanobacterial Diversity of Dokewada Reservoir in Beed District of Maharashtra | M. L. Thumram<br>S. M. Talekar | 43 |
| 13 | Kiran Desai's Hullabaloo in the Guava orchard:The Study of Multicultural Identity | Dr. Sudhir P. Mathpati<br>Subhash Vitthalrao Pandit | 45 |
| 14 | संविधानिक राष्ट्रवादाचा प्रशासनावरिल प्रभाव | प्रा. डॉ. जाधव विठ्ठल सखाराम | 52 |
| 15 | भारतीय संस्कृति के सोपानो का अध्ययन | प्रा.डॉ. विलास तुकाराम राठोड | 56 |
| 16 | महिला सबलिकरण वास्तव आणि व्यथा | डॉ.अशोक डोळस | 59 |
| 17 | दहशतवाद, नक्षलवाद, राजकीय हिंसा | बर्डे भागवत रामप्रसाद | 61 |
| 18 | स्त्री स्वातंत्र्याच्या भारतीय संकल्पना आणि कला | प्रा. डॉ. बालासाहेब कोंडिबा जाधव<br>कैलास मच्छिंद्रनाथ होके | 63 |
| 19 | आदिवासी स्त्री : शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक स्थिती | डॉ.बनायत जी .एच.<br>अभिनिता लक्ष्मण बनकर | 65 |
| 20 | बौद्ध धम्मामध्ये दान पारमिता | प्रा. डॉ. मनोहर सिरसाट<br>पाडमुख भाग्यशाली रामदास | 67 |
| 21 | आदिवासी आत्मकथन व चरित्र वाङ्मयातील धर्मांतरविषयी कार्य | डॉ. विठ्ठल केदारी | 69 |

| | | | |
|---|---|---|---|
| 22 | औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगार स्त्रियांच्या समस्या | प्रा.डॉ.एस.एस.मानकर<br>प्रिती किशोर ढेपे | 73 |
| 23 | बुद्ध तत्त्वज्ञानातील नैतिक शिक्षण आणि पंचशीलाचे महत्त्व | डॉ. बाळासाहेब बा. लिहिणार.<br>वनामाला देविदास श्रीसुंदर | 75 |
| 24 | पर्यायी करप्रणाली असणारा केंद्रीय अर्थसंकल्प | प्रा.डॉ.भगवान सांगळे | 77 |
| 25 | अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि साहित्य | डॉ. विनोद उपर्वट | 81 |
| 26 | हाडकी हाडवळा' या दलित कादंबरीतून अभिव्यक्त झालेला स्त्री जीवन संघष | प्रा. डॉ. मनोहर सिरसाट<br>सुजाता जगन्नाथ बागुल | 83 |
| 27 | मंटो जिंदा है !(मंटो की कहानियों में सामाजिक चित्रण) | डॉ.काळे नवनाथ पुंजाराम | 89 |
| 28 | महिपतीबाबा ताहराबादकर यांनी केलेले संत तुकारामांविषयीचे लेखन | प्रा. बालासाहेब विष्णू कटारे | 91 |
| 29 | कवीश्वराचार्य - भाष्करभट्ट बोरीकर | प्रा. डॉ. माधुरी म. पाटील | 94 |
| 30 | निरोगी जीवनशैली | प्रा. विजय यशवंत देशमुख | 96 |
| 31 | आंबेडकरी चळवळीचा महाकवी-वामनदादा | प्रा.डॉ. मनोहर सिरसाट | 99 |
| 32 | काळा पैसा आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम | प्रा. मनोज सरोदे | 102 |

Research Care Association Aurangabad Organized International E-Conference on Social Science, Law, Management, Humanities and Science & Technology *(ICSSMH-2021)* on 17th Jan. 2021
ISBN-0971-2156
Vol-12 Issue-03
Impact Factor(2020)- 5.24

# ''हाडकी हाडवळा' या दलित कादंबरीतून अभिव्यक्त झालेला स्त्री जीवन संघर्ष''

**प्रा. डॉ. मनोहर सिरसाट**
संशोधन मार्गदर्शक
बलभीम महाविद्यालय बीड
**सुजाता जगन्नाथ बागुल**
संशोधक विद्यार्थिनी
पीएच.डी (मराठी),
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

दलित कादंबरीकाराला समाजातील सर्वच क्षेत्रात घडणारे बदल जाणवतात. त्याप्रमाणे कादंबरीत ही विस्तृतपणे येतात. दलित कादंबरीतील स्त्री ही अन्याय, अत्याचाराला बळी पडलेली आहे. तिची झालेली कुचंबणा, पिळवणूक दलित कादंबरीतून प्रकर्षाने जाणवलेली आहे. समाजव्यवस्थेने सर्व हक्क नाकारलेला, दास्यात जीवन जगणारा दलित समाज आणि त्या समाजातील शेवटचा घटक स्त्री आहे. दलित समाज अंधश्रद्धा, समाजातील रूढी, परंपरा या सर्व गोष्टीत कसा गुरफटत जातो याचे चित्रण दलित कादंबऱ्यामधून दिसून येते. या विषयी म. सू. पगारे यांचे मत पुढीलप्रमाणे - "बाबासाहेबांच्या आठवणींतून, प्रेरणेतून शब्दांचे बळ प्राप्त झाले. शब्द वेदनेचा हुंकार घेऊन बाहेर आले. शब्द जगणं-भोगणं सांगू लागले, शब्द मानवतेचा प्रकाश शोध लागले, गुलामीचा अंध:कार चिरू लागले, शब्द काव्य बनले, शब्द आत्मकथन बनले, शब्दातून 'दलित जीवन' प्रकटू लागले..... दलित साहित्याची निर्मिती म्हणजे अस्सल जीवन दर्शन आहे. साहित्यात जीवन आहे आणि जीवनासाठी साहित्य आहे. हे आपोआपच दलित साहित्याने सिद्ध केले आहे.'[1]

म.सू. पगारे यांचे मत विचारात घेता दलित साहित्य जगलेले, भोगलेले अनुभव मांडते. दलितांना वाचा फुटली, त्यांचे जीवनानुभव साहित्यातून व्यक्त होऊ लागले. साहित्यात सवर्णांची मक्तेदारी होती. सवर्णांनीच लेखन करावे, त्यांचेच विचार साहित्यात उमटत होते. दलितांना संस्कृती, साहित्याने, समाजाने सर्वच ठिकाणी नाकारले होते. सुरूवातीला फुले, आंबेडकरांच्या विचारांनी प्रभावित होऊन दलित लिहिता झाला. अनेक कवी, कवयित्री, लेखक, लेखिका यांनी आपले जीवनानुभव साहित्यातून व्यक्त केले आणि त्यांच्या वाट्याला आलेले वास्तव साहित्यातून नोंदविले आहे. दलित स्त्रियांचे जीवन साहित्यातून मांडण्याचे काम दलित लेखकांनी केले आहे. या विषयी डॉ. ज्योती लांजेवार यांचे मत पुढीलप्रमाणे -

"दलित स्त्रीच्या मूक वेदनांना बोलके करण्याचे धाडस मोजक्या दलितेत्तरांनी दाखिविली असले तरी ते तिच्यातले धैर्य, तिची निर्भयवृत्ती, तिची सहनशीलता ते ओळखून नव्हते. तिला तिच्यातल्या बंडखोरी सहित मराठी वाचकांपुढे आणून दलित कादंबरीकारांनी कादंबरीतील स्त्री-पात्राला एक नवे क्रांतिकारी रूप दिले आहे."[2]

डॉ. ज्योती लांजेवार यांच्या वरील मतानुसार दलित स्त्रीच्या वेदना, तिचं दुःख दलित कादंबऱ्यामधून मांडले आहे. पण तिच्यामधील धाडसी, निडरपणा मोजक्या दलित लेखकांनी साहित्यातून रेखाटलेला आहे. दलित स्त्री चूल आणि मूल यांच्यापुढे जावून तिच्यातील कर्तृत्ववान, कर्तबगारपणा दलित लेखकांनी दलित कादंबरीमधून मांडून समाजासमोर आणण्याचे काम केले

ISBN-0971-2156
Vol-12 Issue-03
Impact Factor(2020)- 5.24

आहे. दलित स्त्री मधील धाडसीवृत्ती, सहनशीलता हे गुण तर आहेतच, पण प्रस्थापित व्यवस्थेला नकार देण्याचे ध्यैर्य देखील तिच्यात आहे. अन्यायाविरूद्ध पेटून उठण्याचे बंड करण्याचे सामर्थ्य देखील दलित स्त्रीमध्ये आहे. दलित कादंबऱ्यामधून अशा निडर वृत्तीच्या दलित स्त्रियांना क्रांतिकारी रूप देण्याचे काम दलित लेखकांनी केले आहे. प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करायला तसेच सामना करायला त्या सिद्ध होतात. इथल्या मूल्यव्यवस्थेशी, समाजव्यवस्थेशी त्या झगडून आपले अस्तित्व निर्माण करतात.

'भूक' ही माणसाला कसे लाचार बनवते, जेवणाच्या बदल्यात दलितांकडून त्यांच्या मनाविरूद्ध कामे करून घेतली जात होती. अस्पृश्यांना पूर्वी गळ्यात मडकं व कंबरेला झाडू अडकवून समाजात वावरावे लागे. कारण दलितांची थुंकी देखील जमीनीवर पडू नये आणि त्यांच्या पायाचे ठसे देखील उमटू नयेत. त्यांनी जमिनीवर थुंकू नये कारण जमीन अस्पृश्यांमुळे बाटली जात असे. अशा प्रकारचे अन्याय, अत्याचार सवर्णांकडून दलितांवर होत असत. पशू पेक्षाही हीन आणि गुलामांपेक्षाही खालच्या दर्जाची वागणूक येथील दलित स्त्रियांना दिली जात होती.

स्वातंत्र्य मिळून कित्येक वर्षे उलटलेली आहेत. तरी देखील दलित स्त्री सुरक्षित नाही. तिला संरक्षण नाही. ही देशाची प्रगती म्हणायची का? दलितांवरील अत्याचारांमध्ये दिवसेंदिवस वाढच होत चालली आहे. ही या देशाची अधोगती आहे, असे म्हणावे लागते. दलित समाजातील असंख्य स्त्रियांच्या असहायत्तेचा फायदा या उच्चभ्रू लोकांनी, राजकारण्यांनी घेतला आहे. त्यांना आपल्या वासनांचे बळी बनविले आहे. आजही राजकारणी, पुढारी, जमीनदार दलित स्त्रियांच्या अब्रूचे धिंडवडे काढून व वासना शमविण्यासाठी आपल्या जाळ्यात अडकविताना दिसतात. उच्चवर्णीयांचे अत्याचार दलित स्त्रियांनी मूकपणे सहन केलेले आहेत. काहींनी आक्रमकपणे प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु त्यांच्या ताकदीपुढे त्याचे काहीच चालले नाही. शिवाय फिर्याद कुणाकडे करणार? न्याय मागायला गेले तर तिथे बलात्कारच, हीच शिक्षा या स्त्रियांना मिळते. आजही दलित स्त्री सुरक्षित नाही, तिला संरक्षण हवे आहे, यासाठी ती संघर्ष करताना दिसते.

ग्रामजीवनाती सुख-दु:खाचा प्रस्तरावर जीवनाचा आलेख निर्माण करण्यासाठी धडपडणारी ही अगतिक स्त्री समाजव्यवस्थेच्या चाकोरीतून जाताना कुटुंबाचे आणि अनुषंगाने येणाऱ्या नात्यांचे भावबंध जोपासताना तिची होणारी ससेहोलपट या कादंबरीतून चित्रित झाली आहे. दारिद्र्यातल्या संसाराला ठिगळं लावून तो नीट करण्याच्या प्रयत्नात असलेली, सुखाच्या एखाद्या क्षणासाठी दु:खाचे डोंगर झेलणारी, नवऱ्याच्या अत्यल्प उत्पन्नात कुटुंबाचा गाडा हाकणे शक्य नाही हे समजून राबराब राबणारी दलित स्त्री परिस्थितीने गरीब असली तरी ती लाचार नाही. जी जगण्यासाठी धडपड करणारी आहे. मात्र पोटाच्या खळगीसाठी अब्रूचा लिलाव करण्यास तिचे मन धजावत नाही, म्हणून ती स्वाभिमानी व शीलवान वाटते.

नामदेव ढसाळ यांची 'हाडकी हाडवळा' (1981) ही दलित जीवनाचे यथार्थ चित्रण करणारी कादंबरी आहे. बायजा या कर्तबगार स्त्रीचे कर्तृत्व या कादंबरीत आलेले आहे. बायजा व तिचा मुलगा सावळा गावात राहतात. भावा-भावात जमीन वाटल्यामुळे जगणे अशक्य होते. बायजाचा नवरा सायबा हा मुंबईला जातो. अशावेळी बायजाला सहन कराव्या लागणाऱ्या संकटाचे चित्रण या कादंबरीतून दिसून येते.

दलितांच्या खुळखुळ्याची काठी ज्या घरी जात असे त्यावर्षी त्यांना पाटलाच्या घरी फुकट कामे करावी

ISBN-0971-2156
Vol-12 Issue-03
Impact Factor(2020)- 5.24

लागत असत. ते काम पुरूष नसेल तर स्त्री ने करावे असे बंधन असे. या कादंबरीमध्ये पोटच्या पोरासारखा ज्याला जीव लागला तो धाकटा दीर 'मनबा' रात्री बायजाच्या अंथरूणावर येतो. त्यावेळेस त्याला बायजाने शिकविलेला धडा हाच या कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. बायजाच्या रूपाने एका धैर्यवान स्त्रीचे दर्शन या कादंबरीतून घडते.

'हाडकी हाडवळा' म्हणजे महारांना मिळालेली सामूहिक इनामी जमीन होय. हाडकी हाडवळा हा गावकुसाबाहेरील एक विशिष्ट भूखंड असतो. गावातील मेलेली ढोरं ओढून आणून तेथेच फाडली जातात. मेलेलं ढोर इतरत्र कोठेही फाडण्याची परवानगी नसते. यावरून हाडकी हाडवळास 'ढोरफाडी' असेही म्हणतात. या भूखंडावर महारांचाच अधिकार, हक्क असतो. हाडकी हाडवळात राहणाऱ्या महारवाड्यातील प्रत्येक कुटुंबावर एक वर्षासाठी 'येसकरी काठी' येत असते. म्हणूनच या कादंबरीतील कालखंड हा एक वर्षाचा आहे. याची सुरूवात येसकर काठी आल्यापासून सुरू होते. यात वर्षाच्या प्रारंभी विशेष समारंभ केला जातो. अगदी सकाळी वाजत-गाजत मारूतीच्या देवळात जातात. काठी मारूतीच्या समोर ठेवतात. तिची पूजा करतात, तिचे दर्शन घेतात, नारळ फोडतात. त्यानंतर ज्याच्याकडे काठी आली तो काठी उचलतो. हातात काठी घेऊन उपस्थितीतांना 'जोहार' घालतो. 'हाडकी हाडवळा' या कादंबरीविषयी डॉ. नंदा मेश्राम यांचे मत, "हाडकी हाडवळा' मध्ये या सण आणि उत्सवांबरोबर एक वर्षाच्या कालावधीमध्ये महारांच्या वाट्याला येणाऱ्या दुःखाचा, कडक जीवनयातनांचा, वर्णभेदाचा एक फेरा, कसा पूर्ण होतो? आणि जो महार आषाढातील दुःख पिऊन जगतो. म्हणजे महारांच्या दुःखाचे वेगवेगळे स्तर, बायजाच्या माध्यमातून, विशेष करून दलित स्त्रीच्या वाट्याला येणारे दुःख किती भयाण असते याचे चित्रण या कथानकातून केले आहे."[3]

डॉ. नंदा मेश्राम यांच्या वरील मतानुसार 'हाडकी हाडवळा' या कादंबरीत महारांच्या वाट्याला येणारे दुःखाचे, कष्टाचे जीवन कसे होते, जो व्यक्ती आषाढ-श्रावणात जगू शकतो, तो सर्व परिस्थितीशी लढू शकतो. आषाढ-श्रावणात महार-मांगना खाण्यासाठी धान्य मिळत नव्हते आणि त्या काळात त्यांच्या हाताला काम पण मिळत नव्हते. जे बलुतं असे ते संपलेलं असायचं. अशा परिस्थितीत बायजा जगते. वाईट परिस्थितीशी संघर्ष करते. या काळात दारिद्र्याची, दुःखाची जाणीव सर्वात जास्त होते. या कादंबरीतून आपल्याला बायजासारख्या दलित स्त्रीचे दुःख किती भयानक असते याची कल्पना येते.

या कादंबरीच्या मूळ कथानकाला गावगाड्याच्या कामाखाली पिचून गेलेली महार स्त्री, नागपंचमीच्या दिवशी बायजाने म्हटलेली फेरावरची गाणी, पेंढाऱ्यांनी केलेला मारवाड्याचा खून, ग्रंथ वाचण्याचा प्रसंग, रक्तपिती झालेल्या माणसाचा मृतदेह उचलण्याचा प्रसंग असे अनेक अनेक प्रसंग ढसाळांनी या कादंबरीत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. बायजाचा नवरा सायबा हा मुंबईला कामासाठी जातो. बायजा व तिचा मुलगा सावळा दोघं गावात राहतात. येसकरकीची काठी बायजाच्या घरी येते, तेव्हा बायजाच्या घरी पुरूष मंडळी कोणी नसते. बायजाचं गावातील येसकरकीची कामे करते. बायजाच्या संघर्षाचे चित्रण या कादंबरीत येते.

दलित कादंबऱ्यांतून संघर्षाचे चित्रण प्रकर्षाने जाणवते. पोटाला अन्न नाही, अंगावर अंगभर वस्त्र नाही, रहायला घर नाही, अशा स्थितीत हा समाज कधी उपाशीपोटी तर कधी अर्ध उपाशीपोटी जीवनाशी संघर्ष करत जगत राहिला. शासन दरबारी पोटाचे भागेल एवढी



२०४

ISBN-0971-2156
Vol-12 Issue-03
Impact Factor(2020)- 5.24

जमीन या समाजाच्या नावावर नसल्यामुळे प्रस्थापित समाजाच्या शिळ्यापाळ्या तुकड्यांवर त्यांची गुजराण चालत आहे. त्यांच्या शेतावरची कामे, घरची कामे, गावकीची महारकीची, येसकरकीची कामे करून अपमानित जीवन जगतो. पोटचा प्रश्न त्यांच्यापुढे आ वासून असल्यामुळे माना-अपमानाची त्यांनी पर्वा केली नाही. तो सोडविण्यासाठी वाटेल तो संघर्ष हा समाज करीत असताना दिसून येतो.

"व्हय नाय करता करता एकदाची काठी बायजाच्या घरी आली. घरी ना गडी, ना माणूस कोनूस, थोरल्या आणि धाकट्या दिराचा बारदाना पोट भरायला मुंबयला. कारभारीसुद्धा तिकडचं. करणार तरी काय इथं राहून? माती आन् दगडं खावीत व्हय! ईन मीन दोन-तीन एकर जमीन हाय हाडकी हाडवळ्याची, पर तिची कूस तरी किती उजवणार?"[४]

वरील ओळी नामदेव ढसाळ यांच्या 'हाडकी हाडवळा' या कादंबरीतून घेतल्या आहेत. येसकरकीची काठी महारांच्या घरी आल्यावर त्यांना किती कामे करावी लागतात व त्यांचा जीव नकोसा होतो. याचे चित्रण या कादंबरीत येते. बायजा या दलित स्त्रीवरती ही कादंबरी चित्रित केली आहे. तिला जीवनात आलेली संकटे, समस्या यांना तिने तोंड देत आपला जीवनप्रवास चालू ठेवलेला असतो.

येसकरकीची काठी बायजाच्या घरी येते तेव्हा तिच्या घरी पुरूष मंडळी कुणीच नव्हते. ते सर्व मुंबईला कामधंद्यासाठी गेले होते. तेव्हा घरात पुरूष नसेल तर बाईला येसकरकीची कामे करावी लागत. तेव्हा बायजा येसकरकीची कामे करते. बायजाच्या घरीच थोडीफार जमीन होती हाडकी हाडवळ्याची. त्या जमिनीला किती कसणार. त्यातून काही उत्पन्न निघत नव्हते. घरातील लोक मग काय दगड-माती थोडी खाणार. त्यामुळे पुरूष मंडळी मुंबईला कामासाठी जातात.

पूर्वी जेव्हा येसकरकीची काठी ज्याच्या घरी जाईल त्याच्या घरी लग्न नाहीतर एखादा मोठा कार्यक्रम होत असे. पण आता ही काठी जर कुणाच्या हातात आली तर जीव नकोसा होतो. बायजा घरातील कामे करून येसकरकीची कामे करते.

"बायजा झपाझपा पाथा उकरल्यासारखं करू लागली. हे सर्व पीक महारा-ढोरांच्या रक्ताचं. ही सर्व बागायती जमीन महारांची, हाडकी हाडवळ्याची वतनी. पण अशाच एका पोटकरप्या दुष्काळात समस्त महारांना फक्त दीड मण दाण्यासाठी इनामदारी असलेल्या बामणाकडे गहाण टाकली. दुष्काळ संपल्यावर महारांनी जमिनीची मागणी केली. घेतलेले दाणे ते परत करायला गेले, पण इनामदारानं धाकदपटशा दाखवून त्यांना हाकलून दिले. खालच्याचं वर केलं. कब्जेदार म्हणून स्वत:चं नाव लावलं आणि गेली दहा ते पंधरा वर्षे तोच खातो आहे."[5]

वरील ओळी नामदेव ढसाळ यांच्या 'हाडकी हाडवळा' या कादंबरीतील आहेत. महारा-मांगाच्या घरात जेव्हा काही खायला नव्हतं. तेव्हा त्यांनी दीड मण दाण्यासाठी आपली वतनी जमीन हाडकी हाडवळ्याची इनामदार बामणाकडे गहाण टाकली होती. जेव्हा दुष्काळ संपला तेव्हा त्यांनी ती जमीन परत करण्याची मागणी केली व घेतलेले दाणे परत दिले. पण इनामदाराने महारा-मांगांना धाक दाखवून हाकलून दिलं व कब्जेदार म्हणून स्वत:चं नाव लावलं.

त्यामुळे महारवाड्यात सगळ्याची दयनीय अवस्था झाली, पण बिचारी गप्प बसली. मुळ ज्याची मालकी त्याच्या हातात कटोरा आला आणि याबाबत विचारपूस कोठे करावी, तर सगळ्याच लोकांना म्हणजे

तलाठी, तालुक्याचा मामलेदार यांना इनामदाराने बांधून टाकले होतं. बायागती जमीन महाराची असून देखील त्यांना त्यातलं पीक तोडता येत नाही. बायजाच्या घरात खायला धान्य नव्हते. सावळा तिचा मुलगा चार-पाच दिवसांपासून तरवडाची भाजी खात होता. म्हणून ती वालाच्या शेंगा तोडते, हे तिला चोरून करावे लागते. स्वत:च्या मालकीची जमीन असल्यावरही ती कसता येत नव्हती. अशा वेगवेगळ्या पद्धतीने महारा-मांगांना जगण्यासाठी संघर्ष करावा लागत होता. त्यात बायजाचं देखील मरण होत होतं. जरी महारा-मांगांनी याविरूद्ध आवाज उठवला तरी त्यांची पाळंमुळं छाटून टाकायची आणि त्यांनी कितीही संघर्ष केला तरी त्याला न्याय मिळत नव्हता.

"म्हारा-मांगाला गावगाड्यात सोबत टिपरं खेळता येत नाहीत... सगळा सरंजाम महारा-मांगांचा, पण त्याचा आनंद काही महारा-मांगानी लुटायचा नाही. त्या खेळात सामील व्हायचं नाही. सर्व काही सेवा म्हारापोरांकरवी करून घ्यायची. फक्त फळ त्यांना चाखू द्यायचं नाही."[6]

वरील ओळी नामदेव ढसाळ यांच्या 'हाडकी हाडवळा' या कादंबरीतील आहेत. नामदेव ढसाळ यांनी या कादंबरीत बायजाच्या घरी येसकरकची काठी आल्यावर तिला किती संघर्ष करावा लागतो याचे चित्रण आले आहे. दलितांना नेहमी खालच्या दर्जाची वागणूक दिली जाते. त्यांच्यावर नेहमी अन्याय, अत्याचार केले जातात. त्यांच्याकडून अनेक कामे इच्छा नसताना करून घेतली जातात आणि त्या कामाच्या बद्दल मोबदला देखील म्हणावा तसा मिळत नव्हता.

बायजाला गावात कुणाचा मृत्यू झाला तर त्याच्या मर्तिकाच्या चिठ्या पोहचाव्या लागत असे. तसेच वारूळ सण असला तर त्याचा निकोप प्रत्येकाला सांगायला जावे लागत होते. तसेच होळीच्या सणाला दहा-बारा दिवस अगोदर होळी जिथे पेटवली जाणार तिथली भोवतालची जागा स्वच्छ करावी लागत. तिथले दगड, विंचू काटे काढावे लागत होते. यानंतर आठ-पंधरा दिवस टिपऱ्यांचा खेळ खेळला जायचा. पण त्या खेळात महारा-मांगांना प्रवेश नव्हता. महारा-मांगांना मोठमोठ्या गॅसबत्या, हिलाल हात डोक्यावर घेऊन जावे लागत होते. दारू कामाच्या ओझ्यांनी त्यांच्या माना मोडून यायच्या. पण त्यांना ही सर्व कामे करावी लागत होती. एवढी सगळी कामे महारा-मांगांच्या कडून करून घ्यायची पण त्यांना खेळात सहभागी व्हायचं नाही. खेळाचा आनंद लुटायचा नाही.

"सर्व जन बायजावर उपसू लागले, तू सखारामाचं प्रेत उचल न्हायतर उद्यापास्नं तुला दारात उभी करणार न्हाय. तुहं बलुतं तुटलं, तुहा गाव तुटलं....."[7]

वरील ओळी नामदेव ढसाळ यांच्या 'हाडकी हाडवळा' या कादंबरीतील आहेत. येसकरकीची काठी बायजाच्या हातात आली आणि बायजाला गावातील सर्व कामे करावी लागतात. कोणी मरण पावले तर त्याचा निरोप द्यायचं काम बायजाकडे होते. दुसऱ्या गावाला कोस-कोस चालून निरोप द्यावा लागे. गावात सखा गावडा मरतो, तेव्हा त्याचे प्रेत कोणी उचलत नाही. कारण त्याला रक्तपिती झालेली असते. त्यामुळे त्याच्या प्रेताला हात कोणीच लावत नाही. त्याचा छोटा मुलगा चिव्हा फार रडतो, त्याची आई अगोदरच वारलेली होती.

बायजाला गावातील लोक म्हणतात की, सखारामाचं प्रेत तू उचल. तेव्हा बायजा म्हणते की मी कसं काय उचलणर ते प्रेत. मी तुमच्या जातीची की पातीची मी तर म्हारीण आहे तू जर प्रेत उचललं नाही, तर तुझं बलुतं बंद करू. बायजाचं उदरनिर्वाहाचं साधन जर बंद करणार असेल तर तिला ते प्रेत उचलावचं लागत. तुला उद्यापासून दारात उभी करणार नाही. तुझं गाव तुटलं, अशी धमकी

तिला गावातील उच्चवर्णीय लोक देतात. दलित लोकांची नेहमीच कुचंबणा केली जात होती. त्यातल्या त्यात दलित स्त्रीची तर यात जास्त फरफट होत असे. 'बायजा' विषयी डॉ. काळे विलास यांचे मत -

"बायजा शीलवान आहे, मनबाने झोपेत तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला, या प्रसंगाने बायजा पूर्णपणे बदलते. सुस्वभावी, प्रेमळ बायजा सूड भावनेने बेभान होते आणि मनबाची हत्या करण्याचा निर्धार करते."[8]

डॉ. काळे विलास यांचे मत अतिशय महत्त्वाचे आहे. 'बायजा' ही स्त्री 'हाडकी हाडवळा' या नामदेव ढसाळ यांच्या कादंबरीतील स्त्री पात्र आहे. बायजा कष्ट करते आणि आपले जीवन जगते. बायजा ही धडाडीची स्त्री आहे. कोणतेही आव्हान पेलण्याची धमक तिच्यात आहे. बायजाचा नवरा सायब्या मुंबईला कामामुळे राहतो. बायजाच्या घरी येसकरकरीची काठी असल्यामुळे तिला गावातील सगळी कामे करावी लागत होती. बायजा गावात तिच्या सावळा मुलासोबत राहत होती. तसेच तिचा चुलत दीर मनबा देखील राहत होता. बायजा रूपाने अतिशय सुंदर आहे. तसेच ती शीलवान देखील आहे. बायजा ही सावळा या तिच्या मुलाप्रमाणेच मनबाला देखील जीव लावते. पण तो तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो. तेव्हापासून बायजा पूर्णपणे बदलते.

धाडसी, कर्तबगार बायजा या प्रसंगाने पूर्णपणे हादरते. सूड भावनेने मनबाचा खून करण्याचे ठरवते. अन्यायाविरूद्ध पेटून उठण्याचे बळ तिला या प्रसंगाने दिले.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१) पगारे म. सू., दलित साहित्याचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्र. आ. 2005, पृ. 60
२) डॉ. लांजेवार ज्योती, मराठी दलित कादंबरीतील स्त्री-चित्रण, सुगावा प्रकाशन, 562 सदाशिव पेठ, पुणे, प्र. आ. 8 मार्च 2008, पृ. 262
३) डॉ. मेश्राम नंदा, दलित कादंबरी : स्वरूप व समीक्षा, डिंपल पब्लिकेशन, ठाणे, प्र. आ. 16 डिसेंबर 2006, पृ. 170,171
४) ढसाळ नामदेव, हाडकी हाडवळा, अस्मिता प्रकाशन, पुणे, प्र. आ. 1981, पृ. 32
५) ढसाळ नामदेव, हाडकी हाडवळा, अस्मिता प्रकाशन, पुणे, प्र. आ. 1981, पृ. 20
६) ढसाळ नामदेव, हाडकी हाडवळा, अस्मिता प्रकाशन, पुणे, प्र. आ. 1981, पृ. 76
७) ढसाळ नामदेव, हाडकी हाडवळा, अस्मिता प्रकाशन, पुणे, प्र. आ. 1981, पृ. 35
८) डॉ. काळे विलास, दलित कादंबरी आशय आणि आविष्कार, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र. आ. 26 जानेवारी 2011, पृ. 105